दिनांक :

प्रति,

**१. मा. केंद्रीय गृहमंत्री, नवी देहली.**

**२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

**विषय : राष्ट्रप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांच्यावर सीबीआयने दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याविषयी....**

महोदय,

डॉ. दाभोलकर यांच्या हत्येचा तपास सध्या केंद्रीय अन्वेषण यंत्रणा (सीबीआय) करत आहे. गेल्या ३ वर्षांत सीबीआयने या प्रकरणी अनेक निरपराध हिंदूंना संशयित म्हणून अटक केली आहे. या प्रकरणी एका संशयित आरोपीने १० मासांपूर्वी दिलेल्या जबाबावरून मुंबई येथील राष्ट्रप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ अधिवक्ता तथा हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय सचिव संजीव पुनाळेकर, तसेच माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. विक्रम भावे यांना २५ मे २०१९ या दिवशी अटक केली होती. पुणे येथील विशेष न्यायालयाने पुनाळेकर यांच्या संदर्भात सीबीआयने केलेले दावे-प्रतिदावे पहाता त्यांना ५ जुलै या दिवशी जामीन मंजूर केला आहे. मुळातच अधिवक्ता पुनाळेकर यांना ज्या कथित गुन्ह्याखाली अटक करण्यात आली, ते गुन्हे चुकीचे आहेत. त्यामुळे त्यांच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे सीबीआयने मागे घेणे आवश्यक आहे.

डॉ. दाभोलकर आणि अन्य पुरोगामी यांच्या हत्यांच्या अन्वेषणामध्ये अन्वेषण यंत्रणा पूर्णत: अपयशी ठरल्या आहेत. त्यामुळे स्वत:चे अपयश झाकण्यासाठी अन्वेषण यंत्रणा सातत्याने कुणाला ना कुणाला लक्ष्य करत आहेत. सीबीआयने अधिवक्ता पुनाळेकर यांना त्यांच्या सहकाऱ्यासह केलेली अटकेची कारवाई अत्यंत चुकीची आणि निषेधार्ह आहे. अधिवक्ता पुनाळेकर यांनी आतापर्यंत समाजातील मागास घटक, निष्पाप हिंदु कार्यकर्ते, पोलीस, पत्रकार, संत आदी अनेकांसाठी त्यांनी केलेले कार्य पहाता त्यांच्यावर इतक्या अयोग्य प्रकारे आरोप करून त्यांना हेतूतः अडकवणे, हे अतिशय संशयास्पद आहे. या प्रकरणात सीबीआय आणि यापूर्वी तपास करणाऱ्या अन्य यंत्रणा यांच्या तपासातील अनागोंदी पहाता निष्पाप हिंदुत्वनिष्ठांचे दमन करण्यासाठी रचलेले हे षड्यंत्र आहे, हे लक्षात येते.

**अ. अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांनी केलेल्या कार्याचा घोषवारा थोडक्यात पुढे देत आहोत –**

**१. पोलीस आणि पत्रकार यांच्यासाठी केलेले कार्य :** ११.८.२०१२ या दिवशी मुंबईतील आझाद मैदान येथे रझा अकादमीच्या ५० सहस्रांहून अधिक धर्मांधांनी दंगल केली. या वेळी धर्मांधांनी 'अमर जवान ज्योती' या राष्ट्रीय स्मारकाची आणि राष्ट्रीय मालमत्तेची हानी तर केलीच, याशिवाय पोलीस आणि पत्रकार यांच्यावरही आक्रमण केले, तसेच सर्वांत गंभीर म्हणजे अनेक महिला पोलिसांवर अत्याचारही केले. या प्रकरणात दंगलखोरांकडून हानीभरपाई वसूल करण्यासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी 'राष्ट्रीय पत्रकार मंच'च्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आणि ती विनामोबदला लढत आहेत. या प्रकरणीही उच्च न्यायालयाने रझा अकादमीकडून हानी भरपाईचा आदेश दिला आहे.

**२. गरिब आणि मागासवर्ग यांसाठी केलेले कार्य :** अ. शासनाकडून अनुदान किंवा भूखंड घेऊन त्यावर जी रुग्णालये बांधली जातात, त्यांत गरीबांसाठी १० टक्के खाटा सवलतीच्या दरात आणि २० टक्के खाटा विनामूल्य असाव्यात, अशी तरतूद आहे; परंतु अनेकांना त्या सुविधेचा लाभ मिळत नाही. हा भाग लक्षात घेऊन गरीबांच्या न्याय्य हक्कासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. यावर न्यायालयाने रुग्णालयांना गरिब रुग्णांसाठी खाटा आरक्षित ठेवण्याचा आदेश दिला.

आ. एका मागासवर्गीय मुलाचा कारागृहात मृत्यू झाला, त्याच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी त्यांना पूर्णपणे विनामूल्य साहाय्य केले.

इ. आदिवासी समाजातील वीटभट्टीवर मजुरी करणाऱ्या एका १६ वर्षांच्या मुलाला रायगड जिल्ह्यातील पोलिसांनी एका खुनाच्या गुन्ह्यात अटक केली आणि त्याचे वय २२ असल्याचे खोटे दाखवले. तो मुलगा निर्दोष असल्याचे आणि त्याच्यावर अन्याय झाल्याचे लक्षात आल्यावर अधिवक्ता पुनाळेकर यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन त्याचा खटला विनामूल्य लढवला. तो अल्पवयीन असल्याचे न्यायालयात सिद्ध केले आणि त्याची निर्दोष मुक्तता केली.

**३. भ्रष्टाचाराच्या विरोधात दिलेला लढा :** अ. महाराष्ट्र शासनाने सरकारीकरण केलेल्या श्री साईबाबा संस्थान, शिर्डी; पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, कोल्हापूर; श्री सिद्धीविनायक मंदिर, मुंबई; श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, पंढरपूर; श्री तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर यांसह अनेक मंदिरांतील सरकारी व्यवस्थापन समित्यांमधील कोट्यवधी रूपयांची भ्रष्टाचाराची प्रकरणे अधिवक्ता पुनाळेकर यांनी उघडकीस आणली आहेत. यातील अनेक प्रकरणांत शासनाकडून चौकशी समित्या स्थापन केल्या आहेत.

आ. अंनिससारख्या कथित पुरोगामी संघटनांनी केलेला भ्रष्टाचार, त्यांनी बेकायदा जमवलेला विदेशी निधी यांविषयीची प्रकरणे उघडकीस आणण्यासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी साहाय्य केले. परिणामी अंनिससारख्या संस्थांवर धर्मादाय आयुक्तांनी 'कारणे दाखवा' नोटीसही बजावली आहे.

**४. निष्पाप हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांसाठी दिलेला लढा :**

अ. वर्ष २००८ मध्ये झालेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणानंतर 'हिंदु आतंकवाद' या काँग्रेसप्रणीत संकल्पनेचा बुरखा फाडण्याचे काम सर्वप्रथम अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांनी विविध स्तरावर वैचारिक प्रतिवाद करून केले. या प्रकरणातील ५ आरोपींसाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी विनामोबदला वकील म्हणून काम पहात त्यांना जामीन मिळवून दिला.

आ. वर्ष २००९ मध्ये मडगाव (गोवा) येथे झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात सनातनच्या ६ निष्पाप साधकांना अटक करण्यात आली होती. त्यांचा खटला अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांनी विनामोबदला चालवला आणि त्या सर्वांचे निर्दोषत्व न्यायालयात सिद्ध करत सहाही जणांची मुक्तता केली.

इ. संतश्री आसारामजी बापू यांना कारागृहात औषधे आणि घरचे जेवण मिळवून देण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करत ते त्यांना उपलब्ध करून दिले.

**५. इलेक्ट्रॉनिक मीडियाचा फोलपणा उघड केला :** 'इंडिया टुडे' या वृत्तवाहिनीच्या एका पत्रकाराने काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना पैशाचे आमीष दाखवून बॉम्बस्फोट प्रकरणी सनातन संस्थेचे नाव घेण्यासाठी उद्युक्त करण्याचा प्रयत्न केला. या कथित 'स्टिंग ऑपरेशन'चा भांडाफोड अधिवक्ता पुनाळेकर यांनी केला. या वेळी अधिवक्ता पुनाळेकर यांनाही सनातन संस्थेच्या विरोधात भाष्य करण्यासाठी २ कोटी रुपये आमीष देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे सांगत त्यांनी प्रसारमाध्यमांचा फोलपणा उघड केला.

**६. देशद्रोह्यांवर कारवाईची मागणी :** शहरी नक्षलवाद, कर्नाटकमध्ये झालेल्या ८ हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या प्रकरणी 'पॉप्युलर फ्रन्ट ऑफ इंडिया'च्या आबीद पाशावर कारवाई करण्याची मागणी करत अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

**आ. माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. विक्रम भावे यांनी केलेल्या कार्याचा थोडक्यात घोषवारा –**

१. 'मालेगाव स्फोटामागील अदृश्य हात' हे पुस्तक लिहून मालेगाव स्फोटाचे खरे स्वरूप उघड केले.

२. माहिती अधिकाराचा वापर करत त्यांनी अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमधील भ्रष्टाचार उघड केले.

वरील सर्व गोष्टींवरून दिसून येते की, अधिवक्ता पुनाळेकर यांनी अनेक सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय असे कार्य केले आहे. तरी त्यांच्यावर अशाप्रकारे आरोप करण्यात आले आहेत.

आतंकवादी याकूब मेमन, अफजल गुरु, अजमल कसाब अशा देशद्रोह्यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी वकील दिले जातात. असे असतांना संशयित म्हणून अटक केलेल्या हिंदूंची बाजू मांडण्यासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी वकीलपत्र घेतले, यात चुकीचे काय ? एखाद्या वकिलाने निरापराध्याची बाजू मांडण्यासाठी प्रयत्न करत त्यांचा संवैधानिक अधिकारच वापरला आहे; पण तरीही त्यांना षड्यंत्रपूर्वक अटक करून हेतूतः हिंदूंचे दमन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे त्याच्या कर्तव्यावर घाला घालण्यासारखेच आहे.

**असे होत राहिले, तर आरोपीने वकीलांना माहिती दिली किंवा वकीलाचा सल्ला ऐकून आरोपी वागला, असे म्हणत सीबीआय देशभरात वकीलांचे अटकसत्र चालू करेल, यात शंका नाही. त्यामुळे सीबीआयने केलेली कारवाई ही संविधान आणि संपूर्ण अधिवक्ता वर्ग यांचा व्यावसायिक न्यायिक अधिकाराचा गळा घोटणारी आहे. याचसमवेत न्यायप्रणालीने अधिवक्त्यांना दिलेल्या 'ऑफिसर ऑफ द कोर्ट' या अधिकाराचे हनन आहे.**

**※ तरी या प्रकरणी आम्ही मागणी करत आहोत की,**

१. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून या प्रकरणातील सीबीआयच्या भूमिकेचाही तपास करण्यात यावा.

२. सीबीआय अधिकारी नंदकुमार नायर यांच्याकडून डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणाचा तपास काढून तो निष्पक्ष अधिकाऱ्याकडे सोपवण्यात यावा.

३. 'सीबीआय'चा कलंकित पूर्वेतिहास पहाता हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांना षड्यंत्रपूर्वक अडकवल्याची अनेक उदाहरणे आहेत. याप्रसंगीही अशी शक्यता नाकारता येत नाही. तरी वरील सर्व गोष्टी पहाता निष्पाप असलेले अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांच्यावर दाखल केलेले गुन्हे मागे घेण्यात यावेत.

४. माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. विक्रम भावे यांना त्वरित सन्मानाने मुक्त करावे.

आपला नम्र,